राज्याच्या अतिमहत्वाच्या व्यक्तींकरीता नवीन हेलिकॉप्टर खरेदी करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्र.विचासं-१११८/प्र.क्र.७९/ २८-अ

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ३२.
दिनांक: ८ मे, २०१८.

वाचा: १) दिनांक ६/४/२०१८ च्या मा.शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकीचे क्र.विचास-१११८/प्र.क्र.३५/२८-अ, दि.२३/४/२०१८ चे इतिवृत्त.

२) उपसंचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई यांचे पत्र क्र. डीए/ एडीएम/४३४/२०१८, दि.२५/४/२०१८ चे पत्र

प्रस्तावना :

राज्याच्या अतिमहत्वाच्या व्यक्तीकरीता नवीन हेलिकॉप्टर खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव विचाराधीन होता. मा.मंत्रीमंडळाने दिनांक ७ सप्टेंबर, २०१७ रोजी नवीन हेलिकॉप्टर घेण्याबाबतचा निर्णय घेतला. त्या अनुषंगाने, हेलिकॉप्टर उत्पादक कंपन्यांकडून जागतिक स्तरावर निविदा सादर करण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर दिनांक ७ नोव्हेंबर, २०१७ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. दि.१६/१२/२०१७ रोजी तांत्रिक निविदा क्र.डीए/एडीएम/६९७/२०१७, दिनांक ६/६/२०१७ अन्वये गठीत केलेल्या तांत्रिक समिती समोर उघडण्यात आली व तद्नंतर दि.१९/१२/२०१७ रोजी वित्तीय निविदा उघडण्यात आली. तांत्रिक समितीने सादर केलेला अहवाल व वित्तीय निविदा ही मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील शक्ती प्रदत्त समिती समोर दिनांक ६ एप्रिल २०१८,च्या बैठकीमध्ये निर्णयार्थ ठेवण्यात आली होती.

शक्ती प्रदत्त समितीने या तांत्रिक व वित्तीय निविदांचा अभ्यास करून राज्य शासनाच्या अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या हवाई प्रवासाकरिता सिर्कोस्की International Operation, INC (लॉकहीड मार्टिन ची कंपनी) या अमेरिकेतील उप्तादक कंपनीकडून S७६-D हे हेलिकॉप्टर खरेदी करण्याचा निर्णय घेतला. दि. ६ एप्रिल, २०१८ रोजीच्या शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकीतील निर्णयांच्या अनुषंगाने, वरील नमुद संदर्भ क्रमांक १ येथील इतिवृत्त निर्गमित करण्यात आले. या इतिवृत्ताच्या अनुषंगाने, शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय :

राज्याच्या अतिमहत्वाच्या व्यक्तींकरीता नवीन हेलिकॉप्टर खरेदी करणेबाबत विमानचालन संचालनालयाने केलेल्या निविदा प्रक्रियेतील विहीत अटी व शर्तीनुसार अमेरिका येथील सिर्कोस्की इंटरनॅशनल ऑपरेशन, आयएनसी (लॉकहीड मार्टिन ची कंपनी) ६९०० मेन स्ट्रीट, पी.ओ.बॉक्स ९७२९ स्ट्रेटफोर्ड, कनेक्टीकट ०६६१५, यु.एस.ए. या उत्पादक कंपनीकडून S७६-D हे नवीन हेलिकॉप्टर टुल्ससहीत खरेदी करण्यासाठी व याप्रित्यर्थ एकूण यु.एस.डॉलर $१,८१,५८,८२५/- शी समतूल्य विनिमय दराने अंदाजे ($ १ = रु.७०/-) रु. १२७.११ कोटी (प्रचलित दरानुसार) खर्चास मंजूरी देण्यात येत आहे.

२. या प्रित्यर्थ चालू आर्थिक वर्षी खालील नमुद उद्दिष्टांर्गत एकुण खरेदी रक्कमेच्या २० टक्के म्हणजेच $ ३६,३१,७६५ (अंदाजे रु.२५.४२ कोटी) रक्कम अथवा त्यावेळच्या प्रचलित परकीय चलन दरानुसार आगाऊ स्वरुपात अदा करण्यास व सदर रक्कम संक्षिप्त देयकाद्वारे खर्ची टाकण्यास खालील अटींच्या अधिन राहून शासन मंजूरी देण्यात येत आहे.

अ) संक्षिप्त देयकाद्वारे रक्कमा काढल्याबाबतचे विमानचालन संचालनालयाचे यापूर्वीचे अन्य तपशीलवार देयक प्रलंबित नाही.

ब) या संक्षिप्त देयकाचे तपशीलवार देयक रक्कमा काढल्यापासून ३ महिन्याच्या आत सादर करण्यात येईल.

क) खर्च नियमित देयकाद्वारे करणे शक्य नसल्याने त्यासाठी संक्षिप्त देयकावर रक्कम काढणे अनिवार्य आहे.

ड) या संक्षिप्त देयकाचे तपशिलवार देयक विहित मुदतीत सादर करण्याची वैयक्तीक जबाबदारी संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांची राहिल.

इ) मासिक निधी विवरणपत्रानुसार या करिता निधी उपलब्ध आहे.

३. कंपनीशी करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील तरतूदीनुसार उर्वरित ८० टक्के रक्कम म्हणजेच $ १,४५,२७,०६० (अंदाजे रु.१०१.६९ कोटी) रक्कम अथवा त्यावेळच्या प्रचलित परकीय चलन दरानुसार अदा करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. सदर उर्वरित ८० टक्के रक्कम जुलै, २०१८ च्या अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित करण्यात येईल.

४. वरील प्रमाणे मंजूर केलेल्या रुपये २५.४२ कोटी तरतूदीचे संदर्भात उप संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांना आहरण व सवितरण अधिकारी म्हणून व संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. आहरण व सवितरण अधिकारी यांनी उपरोक्त नमुद रु. २५.४२ कोटी अग्रीम देण्याची रक्कम उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांच्या कडे धनादेशाद्वारे सूपूर्त करावी व त्यांनी सदर रक्कम प्रचलित परकीय चलनातील दरानुसार लॉकहीड मार्टिन (सिर्कोस्की) या कंपनीस अदा करण्यात यावी.

५. हेलिकॉप्टर खरेदी करार करण्यासाठी आणि हेलिकॉप्टरच्या टेक्निकल व फिजीकल स्वीकृतीच्या प्रशासकीय व इतर कार्यवाहीसाठी संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. संचालक, विमानचालन यांनी कराराची प्रत शासनास त्वरीत सादर करावी.

६. याबाबतचा होणारा खर्च मागणी क्र.ए-४, "२०७०-इतर प्रशासकीय सेवा (११४) परिवहन साधनांची खरेदी व परिरक्षण (००) (०२) विमान चालन विषयक सल्लागार, महाराष्ट्र शासन (अनिवार्य) २०७० ०१५६" या लेखाशिर्षातंर्गत "५२-यंत्रसामुग्री व साधनसामग्री" या उद्दिष्टाखालील

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात उपलब्ध अर्थसंकल्प तरतूदीतून भागविण्यात यावा, व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

७. सदरहू आदेश विमानचालन विभागाच्या विविध बाबींवर निर्णय घेण्यासाठी मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील शक्ती प्रदत्त समितीच्या दि.६ एप्रिल, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१८०५०८१७५१३२८९०७ असा आहे. हे आदेश डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Madhav Vaman Godbole

Digitally signed by Madhav Vaman Godbole
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4d2dece5f3a4f469a1e421d9386418a11b3c1d62679cb7656ad02d464d1fb40f, serialNumber=e3e5082948977afe1d60c7937a8e48890a10857adbef0fda2aacc8fad7e55a9d, cn=Madhav Vaman Godbole
Date: 2018.05.08 17:53:22 +05'30'

(माधव गोडबोले)
सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग
महाराष्ट्र शासन

प्रत ,

१.संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई
२.महालेखापाल, (लेखा परीक्षा/ लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३.उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या.२५), मंत्रालय, मुंबई
४.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
६. सिर्कोस्की इंटरनॅशनल ऑपरेशन, आयएनसी (लॉकहीड मार्टिन ची कंपनी) ६९०० मेन स्ट्रीट, पी.ओ.बॉक्स ९७२९ स्ट्रेटफोर्ड, कनेक्टीकट ०६६१५, यु.एस.ए.
७. निवडनस्ती